# मेट्रो ३ चे ६५ टक्के भुयारीकरण पूर्ण

**मुंबई :** कुलाबा ते सीप्झ या मेट्रो ३ मार्गिकेवरील भुयारीकरणाच्या २० व्या टप्प्याचे काम शनिवारी पूर्ण झाले. कृष्णा २ हे टनेल बोअरिंग मशीन (टीबीएम) नया नगर ते धारावी स्थानक या दरम्यानचे भुयारीकरण पूर्ण करून धारावी स्थानकाजवळ शनिवारी बाहेर आले. मेट्रो ३ च्या चौथ्या पॅकेजमधील चौथा टप्पा त्यामुळे पूर्ण झाला. कृष्णा २ या टीबीएम यंत्राने १३० दिवसांत ५९० मीटर भुयारीकरणाचे काम पूर्ण केले. २० व्या टप्प्याच्या या भुयारीकरणामुळे मेट्रो ३ च्या एकूण मार्गिकेपैकी ३५.८ किमी म्हणजेच ६५ टक्के काम पूर्ण झाले. संपूर्णपणे जमिनीखालून धावणाऱ्या मेट्रो ३ मार्गिकेवर एकूण २७ थांबे असणार आहेत. भुयारीकरणासाठी सध्या १७ टीबीएम यंत्रे कार्यरत आहेत. टीबीएम यंत्रे उतरवण्यासाठी मार्गिकेवरील आठ ठिकाणी मोठी विवरे (लाँचिंग शाफ्ट) खोदण्यात आली आहेत.